MHAH220011962022

नियमित दिवाणी दावा क्र. २८६/२०२२
तय्यब अहमद व इतर वि. अजिज व इतर

आदेश
(नि.क्र.३१ खाली)

सदरच्या अर्जामध्ये वादीतर्फे असे कथन करण्यात आले आहे की, सदर दाव्यात वादी व प्रतिवादी क्र. १ मयत झालेले आहेत. वादीचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी नि.क्र.२९ प्रमाणे व प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेकामी नि.क्र.२३ प्रमाणे अर्ज दिलेले आहेत. नि.क्र.२३ व नि.क्र.२९ वरील अर्ज मे.कोर्टाने दि. १७/०३/२०२५ रोजी मंजुर केलेले आहेत. परंतु नजरचुकीने दाव्यात दुरुस्ती करावयाची राहुल गेली आहे. त्यामुळे वादीने नि.क्र.२३ व २९ वरील आदेशाप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगीचा अर्ज दिला आहे.

२. प्रतिवादीने सदर अर्जास आक्षेप नोंदवून असे कथन केले आहे की, विहित मुदतीत दुरुस्ती न केलेने व संयुक्तीक कारण दिलेले नाही. सबब, मे. कोर्टाचे मर्जीनुरुप आदेश व्हावा अशी प्रतिवादीतर्फे विनंती करण्यात आली आहे.

३. अर्ज वाचला. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, अर्ज नि.क्र.२३ खालील दि. १७/०३/२०२५ च्या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेबाबत माझे पुर्वअधिकारी यांनी आदेशीत केले आहे. तसेच नि.क्र. २९ खालील दि. १७/०३/२०२५ च्या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसुन येत आहे की, वादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेबाबत माझे पुर्वअधिकारी यांनी आदेशीत केले आहे. नि.क्र.१ खालील वादपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, वादीने नि.क्र.२३ व २९ वरील आदेशान्वये दुरुस्ती केलेली नाही. वादीने सदरचा अर्ज दि. १३/१०/२०२५ रोजी केलेला आहे. वादीने आदेशाप्रमाणे त्रयस्त इसमाला दाव्यात पक्षकार करण्यासाठी जवळपास सात महिने उशीर लावलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज वादीने आक्षेप घेणारे प्रतिवादी यांना खर्चाची रक्कम देऊन मंजुर करणे योग्य होईल. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो की,

आदेश

१. वादीचा अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२. वादीने आक्षेप घेणारे प्रतिवादी यांना खर्चाची रक्कम रुपये ५००/- दिल्यानंतर नि.क्र.२३ व २९ वरील आदेशाप्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३. वादीने वरीलप्रमाणे दुरुस्ती आज किंवा पुढील तारखेपर्यंत करावी व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.03.09 12:20:06 +0530

(आर. बी. राऊत)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर.

स्थळ : कर्जत.
दिनांक :०९/०३/२०२६.